S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Please Consider the Environment Before Printing… **Date: 17/03/2025**

## Activity Name: Day Special

# दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

# दिनविशेष



## वैदिक संस्कृतीचे अभ्यासक रामचंद्र दांडेकर

रामचंद्र नारायण दांडेकर हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संस्कृत पंडित आणि वैदिक संस्कृतीचे गाढे अभ्यासक म्हणून ओळखले जात. त्यांचा जन्म १७ मार्च १९०९ रोजी सातारा येथे झाला. त्यांचं भारतीय भाषांव्यतिरिक्त जर्मन भाषेवर प्रभुत्त्व होतं आणि १९३८ साली त्यांनी 'वैदिक मानव' या विषयावर जर्मन भाषेत 'डेर वेदिश मेन्श' हा प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळवली होती. जर्मन संस्कृती, राजकारण अशा विषयांवर त्यांनी स्फुटलेखन केलं होतं. त्यांनी विविध ग्रंथ आणि देशीविदेशी संशोधनपत्रिकांमधून वेद, महाभारत आणि भारतीय धर्म या विषयांवर माहितीपूर्ण लेख लिहिले आहेत. वैदिक देवतांचे अभिनवदर्शन हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ. वैदिक देवतांच्या मूलभूत स्वरूपावर त्यांनी नवीन प्रकाश पाडला आहे.

वेदिक बिब्लिऑग्रफी (१९४६, १९६१, १९७३) हे वेदविषयक लेखनाच्या सूचीचे त्यांनी तयार केलेले तीन खंड, वेदाभ्यासकांना अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरलेले आहेत. अ हिस्टरी ऑफ द गुप्ताज, सम अस्पेक्ट्स ऑफ द हिस्टरी ऑफ हिंदूइझम, सुभाषितावलि, रसरत्नप्रदीपिका, श्रौतकोश, महाभारताची काही पर्वे - असं त्यांचं लेखन प्रसिद्ध आहे. ते अखिल भारतीय प्राच्यविद्यापरिषदेचे प्रधान सचिव होते तसेच 'इंटरनॅशनल युनियन फॉर ओरिएंटल अँड एशियन स्टडीज' या आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्या महामंडळाचे अध्यक्ष होते. भारतातल्या आणि भारताबाहेरच्या संस्कृत भाषा आणि प्राच्यविद्याक्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांचे आणि विद्यापीठांचे ते सदस्य आणि सल्लागार होते. युनेस्कोच्या तत्त्वज्ञान आणि मानव्य विद्याभ्यास शाखेचं त्यांनी उपाध्यक्षपद भूषवलं होतं. १९६२ साली भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला होता. रामचंद्र दांडेकर यांचे ११ डिसेंबर २००१ रोजी निधन झाले.

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401